# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/10/2023 (शनिवार) दुपार

---

## फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर बागडे कॉलनी पहलेपार सावनेर येथे दिनांक २०/१०/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान यातील २ अनोळखी महीला ईसम यांनी फिर्यादी नामे— प्रेरणा नरेश गोंडाणे, वय १९ वर्ष रा. बागडे कॉलनी सावनेर हिला म्हटले की, तुम्ही तुमचे सोन्याचे दागीने मला दया आम्ही तुम्हाला तुमचे दागीने व वरचे १५०००/—रू आणुन देवु असे आमिश दाखवुन फिर्यादीचे गळयातील लॉकेट असलेली सोन्याची चैन वजन ९ ग्रॅम किंमती ५४०००/—रू, सोन्याची अंगठी १ ग्रॅम किंमती अंदाजे ६०००/—रू. व बहीणीचे कानातील सोन्याचे टॉप्स २ ग्रॅम किंमती अंदाजे १२०००/—रू असे एकुण ७२०००/—रू दागीने एका तासात परत आणुन देतो आणि १५०००/—रू. शिल्लक आणुन देतो असे म्हणुन घेवुन गेली परत आली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४०६, ४२०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादव पोस्टे सावनेर मो. नं. ९४२३०५०७४९ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत चौधरी हॉस्पीटल बोरी येथे दिनांक ०७/१०/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक ०८/१०/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विंध्या हरीदास सारवे, वर्ष रा. प्लॉट नं १३९ श्रीमहालक्ष्मी नगर न्यु नरसाळा रोड नागपुर ता. जि. नागपुर याने चौधरी हॉस्पीटल बोरी येथे प्लेजर मोपेड क्र. ३१ डी.यु— १९५७ किंमती ३००००/—रू. पार्कींग मध्ये ठेवली असता हॅडल लॉक तोडुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक खान मो. नं. ९८५०२७८९०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर